


# महाविद्यालय विद्यार्थी परिषदेच्या निवडणूकीकरिता प्राधिकरण

# महाविद्यालयाचे प्राचार्य

# महाविद्यालय विद्यार्थी परिषद निवडणूक




## सूचना

दि. १२/०७/२०१९

वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, न्यायालयीन आदेश, शासन निर्णय आणि विद्यापीठ परिपत्रकाप्रमाणे लवकरच महाविद्यालयात पुढील पदांसाठी खुल्या मतदान प्रक्रियेद्वारे लोकशाही पद्धतीने निवडणूका घेण्यात येतील.

- वर्ग प्रतिनिधी
- अध्यक्ष
- सचिव
- महिला प्रतिनिधी
- राखीव वर्गातील प्रतिनिधी

निवडणूकीबाबतची नियमावली, कार्यपद्धती, निवडणूक प्रक्रिया, आचारसंहिता इ. बाबी अलाहिदा जाहिर केल्या जातील.

— प्राचार्य




# निवडणूक अधिकारी

मा. प्राचार्यांनी नामनिर्देशित केलेला अध्यापक

विद्यार्थी विकास मंडळ – डॉ. जे. एम. साळवे

# निवडणूक समिती




महाविद्यालय विद्यार्थी परिषदेची निवडणूक सुरळीतपणे पार पाडण्यासाठी पुढीलप्रमाणे निवडणूक समिती घोषित करण्यात येत आहे.

१. प्रा. डॉ. सौ. जे. जे. कदम
२. प्रा. डॉ. डी. बी. वायदंडे
३. प्रा. ए. एस. शिंदे
४. प्रा. डॉ. बी. एन. मरगजे
५. प्रा. डॉ. एस. टी. घाडगे
६. श्री. एस. जी. नेवसे
७. श्री. एस. एम. लकडे

# विद्यार्थ्यांसाठी सूचना

१. महाविद्यालय विद्यार्थी परिषदेसाठी इच्छूक विद्यार्थ्यांना उमेदवारी अर्ज किंवा प्रतिनिधी नियुक्त करण्यासाठीचा अर्ज किंवा मतदार यादी इ. महाविद्यालय विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडारामध्ये उपलब्ध होईल.

२. उमेदवारी अर्ज व त्यासोबत आवश्यक कागदपत्रे जोडून त्या वर्गाच्या संबंधित शिक्षकांकडे प्रत्येक उमेदवारी अर्जासोबत रु. ५०/— इतक्या शुल्कासह सादर करता येतील. संबंधित शिक्षक त्या विद्यार्थ्याला कार्यालयाकडून पावती देण्याची व्यवस्था करतील.

३. अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी आणि राखीव प्रवर्ग प्रतिनिधी पदासाठीचे अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रा. डॉ. जे. एम. साळवे यांचेकडे उमेदवारी अर्जासह शुल्क रु. ५०/— जमा करता येतील. प्रा. डॉ. साळवे हे त्या विद्यार्थी उमेदवारांना कार्यालयाकडून पावती देण्याची व्यवस्था करतील

४. संबंधित शिक्षक हे उमेदवारी अर्ज स्विकारतानाच त्या उमेदवारास निवडणूकीविषयी माहिती देतील.

# विद्यार्थ्यांसाठी सूचना

५. विद्यार्थ्यांना आपल्या मतदारांची यादी महाविद्यालयाच्या www.mskcollege.org या संकेतस्थळावर किंवा अर्ज केल्यास वाजवी किंमत आकारुन महाविद्यालय विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडारात उपलब्ध करुन दिली जाईल.

६. विद्यार्थ्यांनी निवडणूक नियमांविषयी सर्व माहिती शिक्षकांकडून करुन घ्यावयाची आहे. सर्व नियम महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

७. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्या विद्यार्थ्याला मतदान करता येणार नाही.

८. निवडणूकीविषयीचे सर्व कामकाज महाविद्यालयाच्या वेळेतच पूर्ण करता येईल. ती वेळ सकाळी ८.३० ते दुपारी १.३० अशी राहील.

९. विद्यार्थ्यांना मतदान केंद्रात मोबाईल फोन वापरता येणार नाही.

# निवडणूक लढविण्याची पात्रता




१. विद्यापीठाच्या पूर्णवेळ मान्यताप्राप्त पाठयक्रमासाठी शैक्षणिक वर्षात नोंदणी केलेली आहे व प्रवेश घेतलेला आहे असा पूर्णवेळ नियमित विद्यार्थी

२. विद्यार्थी पुन:प्रवेश घेतलेला नसावा

३. अगोदरच्या वर्षाचे सर्व विषय उत्तीर्ण असलेला विद्यार्थी

४. ३० सप्टेंबर रोजी वय २५ वर्षे पेक्षा कमी असावे

५. राखीव प्रवर्ग — सक्षम अधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र

# निवडणूक लढविण्यासाठी अनर्हता

पहिल्यांदा प्रवेश घेतल्यापासून सात शैक्षणिक वर्षे पूर्ण असतील

परीक्षेतील गैरप्रकार, गैरवर्तणूक, सक्षम प्राधिकाऱ्याकडून शिक्षा

नैतिक अध:पतनाच्या अपराधासाठी दोषी ठरविलेले असल्यास

# निवडणूक कार्यक्रम




निवडणूक अधिकारी मा. प्राचार्यांबरोबर चर्चा करुन विद्यापीठाच्या सूचनेप्रमाणे कार्यक्रम जाहीर करतील.

निवडणूक कार्यक्रमामध्ये निवडणूका घेणे, अधिसूचना काढणे, प्रसिद्धी आणि निवेदने याबाबतचा सविस्तर वेळापत्रकाचा अंतर्भाव असेल.

# निवडणूकीची प्रक्रिया

- निवडणूक अधिकारी वर्ग प्रतिनिधी निवडण्यासाठी आणि संबंधित विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी आणि राखीव प्रवर्गाचा प्रतिनिधी निवडण्यासाठी पुर्णवेळ अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची / विद्यार्थीनींची तात्पुरती व अंतिम सूची तयार करतील, प्रसिद्ध करतील.
- मतदान मतपत्रिकेद्वारे होईल, मतपत्रिका आडनावांनी सुरु होणारी उमेदवारांची नांवे इंग्रजी वर्णानुक्रमाने नमुद करण्यात येतील
- वर्ग प्रतिनिधी तसेच अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी, राखीव प्रवर्गातील प्रतिनिधी यांकरिता वेगळया मतपेटया असतील
- प्रत्येक विद्यार्थ्याला कमाल पाच मते देण्याचा अधिकार असेल.

# निवडणूकीची प्रक्रिया

- महाविद्यालय विद्यार्थी परिषदेची निवडणूक सरळ बहुमत्वाच्या तत्वानुसार घेण्यात येईल.
- उमेदवारास एका वेळी एकापेक्षा जास्त पदांसाठी निवडणूक लढवता येणार नाही
- निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेला विद्यार्थी नमुना ‘अ’ मधील नामनिर्देशनपत्र प्रत्येक नामनिर्देशन नमुन्यामागे रुपये ५०/— एवढया ना परतावा शुल्कासह सादर करेल
- महाविद्यालय विद्यार्थी परिषदेसाठी निवडून आलेला अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी आणि राखीव प्रवर्गातील प्रतिनिधी, विद्यापीठ विद्यार्थी संघाचे सदस्य असतील
- विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या सदस्यास विद्यापीठ विद्यार्थी परिषदेची निवडणूक लढविता येईल

# निवडणूकीची प्रक्रिया

- महाविद्यालयात निवडणूक केंद्रप्रमाणे मतदान अधिकारी नियुक्त केले जातील
- प्रत्यक्ष मतदानाचा कालखंड सलग चार तास इतका राहिल
- मतदार यादी मतदान केंद्रप्रमाणे जाहिर होईल व केवळ तेथेच विद्यार्थ्याला मतदान करता येईल
- मतदान प्रक्रिया समाप्त झाल्यानंतर मोहोरबंद पेटया तत्काळ अभिलेखासह मतमोजणी केंद्राकडे रवाना केल्या जातील
- मतमोजणी आणि निकालाची घोषणा मतदानाच्या दिवशीच करण्यात येईल
- मतदानाच्या वेळी प्रत्येक मतदाराकडे महाविद्यालयाचे वैध ओळखपत्र असणे आवश्यक आहे
- मतदान केंद्रात मोबाईल फोन नेण्यास परवानगी दिली जाणार नाही

# मतपत्रिकांची छाननी




निवडणूक अधिकारी, मतदान केंद्र अधिकारी किंवा इतर कोणत्याही व्यक्तिला मतपत्रिका छाननीचे अधिकार प्रदान केले जातील




उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी अशा छाननीस हजर राहू शकेल




जेव्हा मतदान केंद्रे अधिक असतील तेव्हा मतपत्रिका एकत्र करुन प्राधिकृत केलेली व्यक्ति छाननी करेल

# मतपत्रिकांची मोजणी

- मतपत्रिकांची मोजणी मतदाना दिवशीच मतदानप्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर एक तासाने सुरू केली जाईल.
- मतपत्रिका गठ्ठयांमध्ये विभागल्या जातील.
- मतपत्रिकांची गठ्ठयांप्रमाणे मोजणी केली जाईल.
- उमेदवार किंवा त्याचा प्रधिकृत प्रतिनिधी यांनाच केवळ मतमोजणीच्या वेळी हजर राहण्यास परवानगी देण्यात येईल. त्याव्यतिरीक्त इतर व्यक्तिंना मतमोजणीच्या ठिकाणापासून पुरेशा अंतराच्या परिघाच्या आत येण्यास अनुमती देण्यात येणार नाही.
- मतमोजणीमध्ये समान मते, चिठ्ठया टाकून त्यावरून ज्याची चिठ्ठी काढण्यात येईल त्याला वगळण्यात आल्याचे मानण्यात येईल.

# निवडणूकांचा निकाल

निवडणूक अधिकारी निवडणूकीचा सर्व निकाल मा. प्राचार्यांना सादर करतील व मतपत्रिकांची विल्हेवाट लावेपर्यंत त्या मतपत्रिका मा. प्राचार्यांकडे सुरक्षित ठेवण्यासाठी देण्यात येतील



# निवडणूकीची आचारसंहिता

- उमेदवारांचे पॅनेल करता येणार नाही
- वर्गप्रतिनिधीसाठी रू. १००० /— व अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी व राखीव प्रवर्ग प्रतिनिधी यांचेसाठी रू. ५००० /— अशी खर्चमर्यादा राहील.
- निकाल घोषीत झाल्यापासून दोन आठवडयात खर्चाचे विवरणपत्र नमुना ‘ब’ प्रमाणे स्व–साक्षांकीत करून सादर करावे लागेल.
- निवडणूकीत धर्म, जात, सामाजिक संघटना, व्यक्ति, राजकीय पक्ष, इतर संघटना यांचे कोणतेही चिन्ह, बोधचिन्ह, छायाचित्र किंवा प्रतिमा यांचा वापर करता येणार नाही.

# निवडणूकीची आचारसंहिता

- महाविद्यालय परिसरात उमेदवारांना मिरवणूक काढण्यास किंवा मेळावा घेण्यास परवानगी असणार नाही
- मतदानादिवशी मतदाराकडे महाविद्यालयाचे वैध ओळखपत्र असणे आवश्यक आहे
- निवडणूकीसाठी वाहने इतर वाहतूकीची साधने वापरता येणार नाहीत
- उमेदवारांना त्यांच्या प्रचारासाठी भित्तीपत्रकासाठी निश्चित केलेल्या जागेचा वापर करता येईल. दर्शनी ठिकाणी अशी सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल
- उमेदवार कोणत्याही परिस्थितीत शत्रुत्व, तणाव निर्माण होणार नाही याची काळजी घेईल
- उमेदवार व सर्व मतदार महाविद्यालय मालमत्तेचे संरक्षण करतील

# निवडणूकीची आचारसंहिता

- कोणत्याही अनधिकृत व्यक्तिस निवडणूक काळात महाविद्यालय प्रांगणात प्रवेश करता येणार नाही
- महाविद्यालयाच्या परिसरात शांतता व सलोखा राखण्याची जबाबदारी सर्वांचीच राहील
- आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यास शिस्तभंगाची किंवा उमेदवारी रद्द करण्याची कारवाई म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर केली जाईल
- ‘‘निवडणूकीशी संबंधीत अपराध’’ बाबत भारतीय दंड संहितेच्या तरतूदी लागू राहतील
- महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी हे निवडणूकीशी संबंधित सोपवलेल्या सर्व जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडतील

# तक्रार निवारण यंत्रणा




व्यथित विद्यार्थी / उमेदवारांस निवडणूक प्रक्रियेदरम्यान निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाच्या विरोधात तक्रारीचे निवारण करण्याकरीता महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे तक्रार दाखल करता येईल. असा अर्ज अभिकथित तक्रार केल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत करता येईल

याशिवाय अधिक तपशीलवार माहिती हवी असल्यास <u>'महाराष्ट शासन राजपत्र'</u> असाधारण भाग चार – ब शुक्रवार दिनांक २६ ऑक्टोबर २०१८ अंक १३८ (२) चा संदर्भ घ्यावा



# Class-wise Polling Officers

| Sr. No | Class | Polling Officers | | | | Peons |
|---|---|---|---|---|---|---|
| | | I | II | III | IV | V |
| 1 | F.Y.B.Com. | S.B.Shinde | D.R.Dubal | S.G.Newase | | S.R.Pharande |
| 2 | S.Y.B.Com. | S.M.Bende | R.S.Kharat | S.M.Lakade | | A.A.Kamble |
| 3 | T.Y.B.Com. | P.T.Jadhav | J.M.Salve | V.G.Agam | | V.K.Kakade |
| 4 | M.Com. I | S.S.Kenjale | S.S.Kshirsagar | R.A.Botre | | S.C.Wadekar |
| 5 | M.Com. II | P.J.Tambe | T.B.Bansode | S.M.Kadam | | A.S.Lakade |
| 6 | F.Y.B.A. [A] | P.Y.Tate-Deshmukh | S.P.Jadhav | P.Y.Jadhav | | N.P.Jagtap |
| 7 | F.Y.B.A. [B] | A.S.Shinde | A.V.Londhe | S.S.Shelke | | S.S.Gaikwad |
| 8 | S.Y.B.A. [A] | J.L.Chaudhari | N.C.Adhav | G.S.Kale | | V.R.Lawande |
| 9 | S.Y.B.A. [B] | N.M.Rajurwar | B.N.Margaje | A.A.Kakade | | K.P.Lakade |
| 10 | T.Y.B.A. [A] | D.B.Waydande | S.T.Ghadge | S.M.Nanaware | | A.V.Kakade |

# Class-wise Polling Officers

| Sr. No | Class | Polling Officers | | | | Peons |
|---|---|---|---|---|---|---|
| | | I | II | III | IV | V |
| 11 | M.A. I | J.J.Kadam | R.S.Shendkar | P.N.Kale | | A.K.Kakade |
| 12 | M.A. II | R.P.Bhosale | K.D.Jagtap | A.H.Kakade | | S.D.Kakade |
| 13 | F.Y.B.Sc. | M.B.Jagtap | M.D.Wable | T.S.Newase | | P.F.Kale |
| 14 | S.Y.B.Sc. | N.J.Nigade | S.Y.Nandkhile | A.S.Bunage | | M.S.More |
| 15 | T.Y.B.Sc. | S.B.Kamble | N.D.Wable | R.V.Hake | | |
| 16 | F.Y.BBA(CA) | R.S.Hake | T.N.Gophane | R.N.Ghadge | | |
| 17 | S.Y.BBA(CA) | R.D.Gaikwad | R.S.More | R.A.Kale | | |
| 18 | T.Y.BBA(CA) | C.C.Taware | R.M.Pathan | P.R.Pharande | | |

# THANK YOU